## घरातील देवतांच्या मूर्तींच्या / फोटो फ्रेमच्या विसर्जनाची व्यवस्था !

सध्याच्या काळात फक्त मुली असणे किंवा मुले परदेशात किंवा स्वतंत्र राहत असल्याने देवघरातील जास्तीच्या मूर्तींचे काय करावे? असा प्रश्न व अडचण लोकांमध्ये आहे. (एकत्र कुटुंबात विवाहात मिळालेली अन्नपूर्णा आणि बाळकृष्णाच्या मूर्ति पूजेत असतील तर त्या सोडून) एकाच देवतेच्या एकापेक्षा अधिक मूर्ति पूजेत असू शकतात. देवघरात पूजा करताना काही मूर्तींची झीज झाल्याने त्या मूर्ति खराब होतात. तसेच काही जण आता देवपूजा करणे पुढील काळात वयोमानामुळे होणार नाही म्हणून किंवा आपल्या पश्चात् कोण करणार? म्हणून **एखाद्या मंदिरात, तळ्याकाठी किंवा झाडाखाली मूर्ति / फोटो इ. ठेऊन जातात**. देवतांची अशी अवहेलना होऊ नये म्हणून पुढील प्रमाणे त्यांची विसर्जन व्यवस्था करता येईल.

**पूजेत असलेल्या ज्या मूर्तींचे विसर्जन करावयाचे आहे त्यांची संकल्पपूर्वक पंचोपचार पूजा आरतीसह करून उत्तरपूजा करावी. (देवांना दहीपोह्याचा नैवेद्य दाखवावा)** उत्तरपूजेचा मंत्र पूजा सांगणाऱ्या गुरुजींना माहीत असतो. आपल्या नेहमीच्या गुरुजींच्या मार्गदर्शनाखाली एखाद्या चांगल्या दिवशी **उत्तरपूजा करून घेऊन देवत्व विसर्जन केलेल्या त्या मूर्ति** चांदीच्या असतील तर आपल्या गावातील सराफ / सोनार यांचेकडे देता येतील किंवा या मूर्ति पितळेच्या, तांब्याच्या असतील तर आपल्या गावातील तांबे-पितळ भांडी विक्रीचे दुकानात देता येतील. तसेच भेट आलेल्या आणि पूजेत नसलेल्या देवतांच्या, संतांच्या प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या, धातूंच्या किंवा दगडी मूर्ति सुद्धा आपल्या गावात (रिसायकलींग) पुनर्निर्मितीसाठी कोणी मूर्तिकार घेत असतील तर त्यांना देता येतील, **जर ही व्यवस्था होऊ शकत नसेल** तर उत्तरपूजा केलेल्या मूर्ति आणि पूजेत नसलेल्या मूर्ति सुध्दा **बॉक्स मध्ये ठेवून कुरीअरने किंवा कोणाही मार्फत सोबत दिलेल्या संकलन केंद्रांशी फोनवर संपर्क करून पाठविता येतील.** याबरोबरच देवतांचे, संताचे, पूर्वजांचे फ्रेम केलेले किंवा लॅमिनेटेड फोटो सुद्धा कुरीअरने पाठवू शकता.

**(सदरचे संकलन केंद्र त्या मूर्तींचे / फोटोंचे कारखान्यात विघटन करून त्यापासून पुन्हा मूर्ति किंवा योग्य अशी अन्य उपकरणे बनविण्याचे काम करते.)**

आपल्या देवतांच्या मूर्तींची / फोटोंची अवहेलना होऊ नये आणि प्रदूषण न होता पर्यावरण राखले जावे यासाठी वरील व्यवस्थेचा विचार आम्ही दिलेला आहे. हा '**कालसुसंगत**' विचार आणि व्यवस्था ज्यांना मान्य आहे, त्यांनी सोबत दिलेल्या सूचनांप्रमाणे संकलन केंद्राशी संपर्क करावा, ही विनंती.

**- दाते पंचांगकर्ते**

फोटो / मूर्ति संकलन केंद्राचे नाव - **विधिवत्**
**संचालिका - सौ. जान्हवी रोहित फडणीस, पुणे**
**चौकशी करिता संपर्क** - 9422594215

**- सूचना -**

- सर्व प्रकारच्या मूर्ति, फोटो यांचे ३ किलोपर्यंत वजनासाठी रु. ५००/- सेवा शुल्क आहे. (पुढील प्रत्येक किलो पर्यंत रु. १००/- अधिक सेवा शुल्क आहे.)
- गुरुजींची दक्षिणा आणि कुरिअर खर्च वेगळा असेल.
- फोटो / मूर्ति संकलन केंद्रापर्यंत कोणत्याही मार्गाने व्यवस्थित पोचविण्याची जबाबदारी पाठवणाऱ्याची असेल.
- 9822878915 या G-Pay नंबरवर इष्ट सेवा शुल्क पाठवल्यानंतर कृपया पेमेंटचा स्क्रीनशॉट आणि आपली माहिती म्हणजेच नाव, पत्ता, फोन नंबर पाठविणे.
- त्यानंतर आपण दिलेल्या माहितीनुसार संकलन केंद्राचा पत्ता आपणास पाठविण्यात येईल, त्या पत्त्यावर आपण कुरिअरने किंवा अन्य मार्गाने बॉक्स पाठविणे.

---

**सेवा शुल्क पाठविण्यासाठी**
G-Pay Number - 9822878915

UPI ID - jrphadnis@okicici